Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोव्हिएत युनियन शांततेसाठीं कां लढतें ?

लेखक

ई. तार्ले

सोव्हिएत युनियनच्या वैज्ञानिक अॅकॅडमीचे सभासद

★

तासच्या हिंदुस्थानांतील प्रतिनिधी द्वारा प्रकाशित.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्

पुस्तक संख्या .....

पञ्जिका संख्या .....

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोव्हिएत युनियन शांततेसाठीं कां लढतें ?



लेखक

ई. तार्ले,

सोव्हिएत युनियनच्या वैज्ञानिक ॲकॅडमीचे सभासद

स्टाक प्रमाणिकरण १९८४-१९८५

किंमत २ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

		पृष्ठ
१	सोव्हिएत युनियनच्या परराष्ट्रीय धोरणाचें सर्वसामान्य सूत्र	१
२	दगावाज योजनांचें अपयश	७
३	युद्धापासून फायदा कुणाचा होतो ? ...	१०
४	तुलनेनें वस्तूंचें ज्ञान होतें	१५
५	युद्ध-मानवतेविरुद्ध सर्वांत मोठा गुन्हा ...	२२
६	सारांश	२६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अॅकॅडेमिशियन एवगेनी तार्ले

सोविएत युनियनचे अग्रगण्य इतिहासकार अॅकॅडेमिशियन एवगेनी तार्ले यांचा जन्म युक्रेनमधील निकोलायेव या शहरांत १८७५ सालीं झाला. कीव विश्वविद्यालयांत शिक्षण घेऊन ते १९०१ सालीं एम. ए. झाले. या परीक्षेसाठीं "थॉमस मूरच्या काळांतील ब्रिटनच्या आर्थिक परिस्थितिसंबंधी मूरचे विचार" या विषयावर त्यांनीं प्रबंध लिहिला होता. यानंतर "क्रांतिकारक कालखंडांतील फ्रांसचा कामगार वर्ग" हा ग्रंथ लिहून त्यांनीं १९०९ सालीं डॉक्टरची पदवी मिळविली. १९२२ सालीं त्यांना सोविएत युनियनच्या विज्ञानअॅकॅडमीचे सह-सभासद निवडण्यांत आलें आणि १९२९ सालीं ते अॅकॅडमीचे पूर्ण सभासद झाले.

१९०३ पासून श्री. तार्ले हे लेनिनग्राड, मॉस्को, आणि तार्तु या विद्यापीठांत व्याख्याते म्हणून आहेत. अनेक शास्त्रीय ग्रंथ, सामान्य जनतेनें वाचण्यासारखीं शास्त्रीय विषयांवरची पुस्तकें आणि पश्चिम युरोपच्या इतिहासासंबंधी अनेक लेख त्यांनीं लिहून प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांच्या कित्येक पुस्तकांचा प्रमुख युरोपियन भाषांत अनुवाद झाला आहे आणि युरोप व अमेरिकेच्या कांहीं देशांत या अनुवादित पुस्तकांच्या कित्येक आवृत्तीदेखील प्रसिद्ध झाल्या आहेत. "युरोपची नाकेबंदी" हा विस्तृत ग्रंथ त्याचप्रमाणें नेपोलियनच्या काळासंबंधींचीं "नेपोलियन" "नेपोलियनची रशियावरील चढाई" वगैरे इतर पुस्तकें हें त्यांचें सर्वांत प्रसिद्ध लिखाण आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत "क्रिमीयन युद्ध" (२ खंड) हा ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केला. त्याच्या पहिल्या खंडाबद्दल त्यांना स्तालिन पारितोषिक मिळालें. "राजनीतीचा इतिहास" या मौलिक ग्रंथाचे सह-लेखक म्हणून केलेल्या लेखनाबद्दल त्यांना दुसऱ्यांदा स्तालिन पारितोषिक मिळालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
सॉबान, ऑस्लो, प्रागचा चार्ल्स, व ऑल्जीरया या विद्यापीठांकडून त्यांना डॉक्टरेटची सन्मान्य पदवी मिळालेली आहे. तसेंच नॉर्वेच्या वैज्ञानिक ॲकॅडमीचें ते सभासद आहेत, इतिहास, तत्त्वज्ञान व भाषाशास्त्र या शास्त्रांच्या संवर्धनासाठीं असलेल्या ब्रिटिश ॲकॅडमीचे ते सहसभासद आहेत आणि इतरहि अनेक शास्त्रीय संस्थांचें ते सभासद आहेत.

१९४२ सालीं, जर्मन फॅसिस्ट आक्रमकांनीं व त्यांच्या साथीदारांनीं केलेले गुन्हे शाबित करण्यासाठीं, त्यांची चौकशी करण्यासाठीं व त्यांपासून झालेल्या हानीचा अंदाज करण्यासाठीं सोविएत युनियनमध्यें जी असाधारण सरकारी समिति नेंमण्यांत आली तिचे सभासद म्हणून ॲकॅडेमिशियन तार्ले यांची निवड करण्यांत आली होती.

श्री. ई. तार्ले हे सोविएत शांतता कमिटीचे सभासद आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोविएत युनियनच्या परराष्ट्रीय धोरणाचें सर्वसामान्य सूत्र

सोव्हिएत-विरोधी प्रचारांत मांडण्यांत येणाऱ्या गोष्टी पाहून आपल्याला पुष्कळ वेळा नवल वाटतें आणि प्रश्न पडतो कीं हें सर्व कुणासाठीं आहे ? " लाल साम्राज्यवाद " नांवाची कांही तरी चीज अस्तित्वांत आहे, सोविएत युनियनचा परक्या मुलखावर डोळा आहे व दुसऱ्यांवर आक्रमण करण्यासाठीं तें धडपडत आहे अशा प्रकारच्या गोष्टी कुणाला पटवून देण्यासाठीं हा अट्टाहास चालला आहे ? सोविएत-विरोधी वृत्तपत्रें वाचणें किंवा रेडियोवर तसलीं वक्तव्यें ऐकणें या खेरीज ज्यांना दुसरा मार्ग नाहीं, सोविएत युनियन विषयींची सत्यस्थिति ज्यांच्या पासून लपवून ठेवण्यांत येते, अशा लोकांसाठींच हा प्रचार आहे हें उघड आहे.

आपल्याला कुठें नेण्यांत येत आहे, हें सर्व कशासाठीं चाललें आहे आणि त्यासाठीं कोणत्या प्रकारच्या विलक्षण व लबाड युक्त्याप्रयुक्त्यांचा उपयोग केला जात आहे हें जर लोकांना कळलें तर हा सोवियत विरोधी प्रचार यशस्वी होण्याची मुळींच आशा नाहीं. तिसरें महायुद्ध पेटवूं पहाणाऱ्यांना हें चांगलेंच माहीत आहे.

या सदगृहस्थांनीं निरनिराळ्या नांवाखालीं हा " लाल बागुलबोवा " गेलीं ३६ वर्षे आपल्या शस्त्रभांडारांत टिकवून ठेवला आहे ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. अर्थात हा इतिहास अचूक सांगायचा तर हेंहि जरूर नमूद केले पाहिजे कीं दुसऱ्या महायुद्धाच्या चार वर्षांच्या काळांत ही सोविएत-विरोधी निंदा बरीच कमी झाली होती. परंतु त्याचें कारण हें होतें कीं त्यावेळीं सोविएत जनता आपल्या अतुल शौर्यानें आणि अलौकिक स्वार्थत्यागानें जागतिक संस्कृतिला नाझी रानटीपणापासून वांचवण्याचे काम करीत होती आणि ते कार्य तिनें पारहि पाडलें; म्हणून अशा वेळीं गोबेल्सनें चालविलेल्या सोविएत-विरोधाला हात भार लावणें ' सोयीस्कर ' नव्हतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
युरोपमधल्या सामान्य माणसाला भेडसावण्यासाठी "बोल्शेविक धोक्याची" भीति आजच घातली जात आहे असें नाहीं. व्हर्साय परिषदेवेळीं क्लीमन्सो, विल्सन आणि लॉयड जॉर्ज यांच्या काळांत तीच भीति घातली जात नव्हती का? जुन्या पिढींतल्या लोकांना त्या वेळचा एक प्रसिद्ध फलक अजूनहि आठवतो. त्यांत दातांत सुरा घेतलेला अक्राळविक्राळ चेहऱ्याचा राक्षसासारखा एक माणूस दाखवला होता. फ्रांसमध्यें त्याला "सुरेवाला माणूस" म्हणत असत. कोणत्याहि क्षणीं पाश्चात्य देशांवर झडप घालण्यासाठीं टपून बसलेला 'बोल्शेविक' लोकांना दाखवणें हा या फलकाचा हेतू होता आणि तो साऱ्या युरोपखंडांत भिंतीभिंतीवर चिकटवण्यांत आला होता.

रशियाच्या जनतेनें त्यावेळीं भांडवलदारी गुलामगिरीचें जूं झुगारुन दिलें होतें आणि ज्यांत गांजणूक नाहीं, ज्यांत मानवाची मानवाकडून होणारी पिळणूक नाहीं आणि ज्यांत सर्व सामान्य जनतेला, श्रमणाऱ्या जनतेला सुखाचा आणि समृद्धिचा लाभ होईल असें नवजीवन निर्माण करण्याचें कार्य तिनें हातीं घेतलें होते. आपल्या निर्लज्ज प्रचाराच्या पडद्याआड व्हर्सायच्या "शांतता-कर्त्यांनीं" या रशियन जनतेविरुद्ध हस्तक्षेप करण्याच्या योजना आंखल्या आणि त्या अंमलांत आणल्या.

या प्रचाराचा पडद्यासारखा उपयोग करून व्हर्सायचें धोरण आंखणाऱ्यांनीं रशियाला छिन्नविच्छिन्न करण्याच्या आणि लुटण्याच्या योजना तयार केल्या, शेजारच्या छोट्या राष्ट्रांना रशियाविरुद्ध चिथविलें, जनतेची कत्तल उडविणाऱ्या प्रतिक्रांतिकारक झारशाही सेनापतींना अलोट पैसा आणि शस्त्रसामुग्री पुरविली आणि बाल्यावस्थेंत असलेल्या सोविएत समाजसत्ताक प्रजाराज्याविरुद्ध युद्ध पुकारण्यासाठीं कित्येक देशांना आपल्या संयुक्त गटांत ओढलें.

अर्थात आजच्याप्रमाणें त्यावेळींदेखील हे सभ्य गृहस्थ स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या रक्षणाविषयीं, मानवी हक्क आणि शांतता याविषयीं व्याख्यानें झोडीतच होते. परंतु त्याचवेळीं त्यापैकीं कांहीं जणांचे लोभी हात कॉकेशसच्या तेलावर कब्जा करण्यासाठीं पुढें सरसावत होते, युक्रेनला आपली वसाहत बनवण्याचीं मनोराज्यें इतर कांहींजण रचीत होते तर आणखी कांहींजण उत्तर रशियाच्या समृद्ध अरण्यांवर डोळा टेवून होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
आणि ऑक्टोबर क्रांतिमुळे मुक्त झालेल्या जनतेचे वर्तन त्या काळांत कसें होतें ? जनतेच्या इच्छेनें नुकत्याच अस्तित्वांत आलेल्या सोविएत राज्यसत्तेनें आपल्या ध्वजावर कोणतीं घोषवाक्यें कोरली होतीं ? कोणतें अंतर्गत आणि पर राष्ट्रीय धोरण ती अंमलांत आणीत होती ?

स्वतःचा जन्म होतांक्षणींच सोविएत राज्यसत्तेनें सर्व राष्ट्रजनांच्या संपूर्ण समतेच्या तत्त्वाची घोषणा केली आणि आपल्या सर्व व्यवहारांत तें तत्त्व अंमलांत आणण्यास सुरवात केली. हें तत्त्व म्हणजे समाजसत्तांक राज्याच्या अंतर्गत आणि परराष्ट्रीय धोरणाचा पाया बनलें आहे.

सोविएतच्या झेंड्याखालीं भिन्नभिन्न भाषा बोलणारी आणि भिन्नभिन्न रीतरिवाज आणि इतिहास असणारीं राष्ट्रें एका राज्यांत एकवटलीं. कमी अधिक लोकसंख्येचा विचार न करतां, सर्व राष्ट्रगटांना स्वातंत्र्य आणि स्वाधीनता यांचा लाभ करून देणाऱ्या संस्था सोविएत राज्यानें त्यांना बहाल केल्या आणि त्याचबरोबर अखिल-संघ राज्याचे कायदे करण्यांत आणि सर्व राज्यसंस्थेचा राज्यकारभार चालविण्यांत प्रत्यक्ष भाग घेण्याचा अधिकारहि त्यांना दिला.

सर्व राष्ट्राच्या संपूर्ण समतेच्या तत्त्वाच्या आधारावरच सोव्हिएत देशाचें परराष्ट्रीय धोरण पूर्वी ठरलें आहे आणि आजहि ठरत आहे कारण कोणत्याहि राज्याचें परराष्ट्रीय धोरण त्याच्या अंतर्गत धोरणासून अविभाज्य असतें. ऑक्टोबर क्रांतिनंतर सोविएत राज्यानें टाकलेल्या प्रथम पावलांपैकीं एक महत्त्वाचें पाऊल हें होतें कीं क्रांतिपूर्वी, इराण, चीन व इतर देशांशीं विषम करार करून झारशाही रशियानें मिळविलेल्या जादा हक्कांवर आणि खास सवलतींवर त्यानें पाणी सोडलें आणि हे जुने करार रद्द करुन त्याऐवजीं संपूर्ण समतेच्या आधारावर नवे करार केलें.

क्रांति विजयी होतांच दुसऱ्या दिवशीं, ८ नोव्हेंबर १९१७ रोजीं, लेनिननें तयार केलेला आणि लेनिनची सही असलेला शांततेचा जाहिरनामा सोविएत सरकारनें प्रसिद्ध केला. सर्व युद्धमान देशांच्या जनतेला उद्देशून असलेल्या या जाहिरनाम्यानें साम्राज्यवादी संहाराचा अंत करण्याची हांक दिली, कोणतेंहि साम्राज्यवादी लुटारु युद्ध म्हणजे मानवतेविरुद्ध सर्वांत मोठा गुन्हा असल्याचें जाहिर केलें, आणि लोकशाहीवर आधारित अशा शांततेच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
तहनाम्यांची मागणी केली. इतिहासातील पहिल्या समाजसत्ताक राज्याने तात्काल दाखवून दिलें कीं आपल्या शब्दांत व कृतींत अंतर नाहीं आणि लुटारु युद्धें ही समाजसत्ताक राज्याच्या स्वभावाशींच विसंगत आहेत. कारण ज्याचा मुख्य उद्देश स्वतःच्या जनतेचें संपूर्ण आणि सर्वांगीण दास्यविमोचन करणें हा आहे असें राज्य दुसऱ्या राष्ट्रांना गुलाम करण्याचा आणि लुटण्याचा विचार स्वप्नांतहि बाळगूं शकत नाहीं.

शांततेच्या या उदात्त आवाहनाला दोन्ही साम्राज्यवादी गटांच्या राज्यकर्त्यांकडून कोणतें उत्तर मिळालें ? सोव्हिएत राज्यांत हस्तक्षेप, अन्नपुरवठ्याची कोंडी, नाकेबंदी, आणि सोव्हिएत् प्रजाराज्याविरुद्ध गलिच्छ प्रचाराची चिखलफेक—हें त्यांचें उत्तर होतें.

देशावर हल्ला चढविणाऱ्या शत्रूंना अनेक आघाड्यांवर मागें हटवून त्यांचा धुव्वा उडण्याचें कार्य तर सोविएत राज्यानें केलेंच पण त्याचवेळीं शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्नहि चालू ठेवले. ५ ऑगस्ट १९१८ पासून डिसेंबर १९१९ पर्यंत म्हणजे जवळ जवळ १५ महिन्यांत, शांतता प्रस्थापित करण्यासंबंधीं भांडवलदारी राष्ट्रांना सोव्हिएत राज्यानें ११ वेळां सूचना केल्या ही एकच गोष्ट यासंबंधानें सांगणें पुरेसें होईल. या सर्व सूचना झिडकारण्यांत आल्या.

डिसेंबर १९१९ मध्यें ८ व्या अखिल रशियन सोविएत परिषदेनें (राज्याच्या सर्वोच्च सत्तेनें) लेनिनच्या सूचनेवरून एकमतानें ठराव करून म्हटलें होतें,

"रशियन समाजसत्ताक संघ-सोविएत प्रजा-राज्य इतर सर्व राष्ट्रांशीं शांततेनें नांदूं इच्छितें आणि सोविएत पद्धतीच्या आधारावर आपलें उत्पादन, वाहतूक आणि सार्वजनिक कारभार चालू करण्यासाठीं अंतर्गत रचनेच्या कार्यावर आपली सारी ताकद लावू इच्छितें; दोस्त राष्ट्रांच्या हस्तक्षेपामुळें आणि अन्नपुरवठ्याच्या नाकेबंदीमुळें आंतापर्यंत हें कार्य त्याला हातीं घेतां आले नव्हतें."

सर्व देशांबरोबर शांततामय सहअस्तित्वानें नांदण्यासाठी झटणें—हें सोविएत राज्याच्या परराष्ट्रीय धोरणाचें सारसर्वस्व या विधानांत निश्चितपणें व्यक्त झालें एवढेंच नव्हे तर शांततेसाठी अशा प्रकारें झटण्यामागचा प्रमुख

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
आणि निर्शस्त्रीकरण हेच कोणत्याही हिंदुस्थान सुरक्षा धोरणाचे मूलभूत तत्त्व असल्याचे जाहीर करण्यात आलें. " अंतर्गत रचनेच्या कार्यावर सर्व ताकद केंद्रित करण्याची इच्छा " हाच हा हेतू होता.

परंतु या हांकेकडे देखील दुर्लक्ष करण्यांत आलें. हस्तक्षेप आणि प्रतिक्रांतिकारक फौजांना परकीय मदत या गोष्टी चालूच राहिल्या, त्याचबरोबर सोवियत युनियनविरुद्ध राजनैतिक कारस्थानें रचण्याच्या आणि शेजारच्या राज्यांना सोवियत युनियनविरुद्ध उठविण्याच्या कारवायाहि तशाच चालू राहिल्या.

सोविएत जनता या दिव्यांतून उत्तम प्रकारें बाहेर पडली. हस्तक्षेप करणाऱ्यांचा पराभव झाला आणि सोविएत भूमीवरुन त्यांची हकालपट्टी करण्यांत आली. त्यानंतरहि शांतता बळकट व भक्कम करण्याचा लढा सोविएत युनियननें अविश्रांतपणें चालू ठेवला. सोविएत प्रतिनिधींची उपस्थिति असलेली पहिली आंतरराष्ट्रीय परिषद म्हणजे १९२२ सालीं भरलेली जिनोआ परिषद होती. या परिषदेंत शांततेचा, जुनी भांडवलदारी समाजव्यवस्था आणि नवी उदयोन्मुख समाजसत्ताक समाजव्यवस्था यांच्या शांततामय सहअस्तित्वाचा प्रश्न सोविएत प्रतिनिधींनीं अगदीं रोखठोक शब्दांत उपस्थित केला.

रशियन प्रतिनिधीनें आपल्या निवेदनांत म्हटलें होतें.

" परिषदेंत सार्वत्रिक शस्त्रास्त्र कपातीची सूचना मांडण्याचा सोव्हिएत शिष्टमंडळाचा इरादा आहे. त्याचप्रमाणें विषारी वायु, हवाई युद्ध आणि तत्सम इतर प्रकार, विशेषतः शांततामय लोकवस्तीविरुद्ध संहारक साधनांचा उपयोग यांसारख्या अत्यंत रानटी युद्ध प्रकारांवर संपूर्ण बंदी घालणाऱ्या नियमाची युद्धाच्या नियमांत भर घालण्यांत येत असेल आणि सर्वच राष्ट्रांच्या फौजा कमी करण्यांत येत असतील तर लश्करशाहीचा बोजा कमी करण्याच्या हेतूनें मांडण्यांत येणाऱ्या अशा कोणत्याहि सूचनेला सोव्हिएत शिष्टमंडळ पाठिंबा देईल. "

यानंतरच्या काळांत सार्वत्रिक निःशस्त्रीकरण आणि सामुदायिक सुरक्षितेच्या पद्धतिची स्थापना यासंबंधीं राष्ट्रसंघामध्यें सोव्हिएत युनियनच्या प्रतिनिधींनी वारंवार सूचना मांडल्या. १९२७ सालीं राष्ट्रसंघाच्या प्रारंभिक निःशस्त्रीकरण समितिमध्यें संपूर्ण निःशस्त्रीकरणाचा कार्यक्रम अंमलांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
आणण्याच्या आवश्यकतेबद्दल सोव्हिएत शिष्टमंडळानें एक ऐतिहासिक निवेदन सादर केलें. खुष्की, आरमारी आणि हवाई दलांतील सर्व लोकांना घरीं पाठवावें, सर्व दारूगोळा आणि इतर शस्त्रास्त्रें नष्ट करावीत, लष्करी शिक्षणाच्या याद्या रद्द कराव्यात, लष्करांत भरती करण्याचे कायदे रद्द करावेत, लष्करी उद्देशासाठी अंदाजपत्रकांत पैसा देण्याचें बंद करावें वगैरे सूचना सोविएत शिष्टमंडळानें मांडल्या.

खरीखुरी शांतता प्रस्थापित करण्यासाठीं या सोविएत कार्यक्रमापेक्षां अधिक मूलग्राही असें कांहींहि शक्य होतें काय ?

निःशस्त्रीकरणासंबंधी सोविएत युनियननें केलेल्या सर्व सूचनांना भांडवलदारी राज्यांनीं एकच उत्तर दिलें व तें उत्तर म्हणजे शस्त्रास्त्रें वाढविणें !

जर्मनींत नाझींनी सत्ता काबीज केल्यानंतर युद्धाचा धोका भयंकर वेगानें वाढूं लागला. जर्मन व इटालियन फॅसिस्टांनीं आणि जपानी लष्करशहांनीं कित्येक देशांविरुद्ध प्रत्यक्ष आक्रमणाच्या कारवाया सुरूं केल्या. (१९३१-३२ मध्यें जपाननें मांचुरिया गिळंकृत केलें, १९३५ सालीं इटलीनें अबिसिनीया-विरुद्ध सुरू केलें, १९३८ सालीं नाझी जर्मनीनें जबरदस्तीनें ऑस्ट्रिया बळकावला, हिटलरी फौजांनीं झेकोस्लोव्हाकियांत ठाण मांडलें.) जपानी लश्करशहांनीं सोव्हिएत युनियनविरुद्ध देखील आक्रमणाच्या कारवाया सुरू केल्या. (१९३८ मध्यें लेक हसन येथें व त्यानंतर १९३९ मध्यें खालखिन गोल येथें) परंतु त्यांना सणसणीत थप्पड बसली.

राष्ट्रसंघांत त्याचप्रमाणें अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांत सोविएत युनियननें अविश्रांतपणें मागणी केली कीं या आक्रमकांना आळा घालण्यासाठीं प्रभावी उपाययोजना झाली पाहिजे. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्सच्या नेत्यांनीं तथा-कथित " तटस्थते " चें, युद्धाची तयारी करीत असलेल्या फॅसिझमला " संतुष्ट " ठेवण्याचें जें धोरण आंखलें होतें त्याविरुद्ध सोविएत युनियननें निर्धारानें झुंज दिली. थेट १९३३ सालींच सोविएत युनियननें आक्रमणाची प्रमाणभूत व्याख्या तयार करून राष्ट्रसंघापुढें मांडली. ही व्याख्या कित्येक राष्ट्रांनीं मान्य केली होती आणि अनेक राज्यांच्या सह्या असलेल्या खास करारनाम्यांतहि ती नमूद करण्यांत आली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दगाबाज योजनांचें अपयश

परंतु अमेरिका ब्रिटन व फ्रान्स यांच्या राज्यकर्त्यांनीं सोविएत युनियनच्या इशाऱ्यांकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें. आक्रमकाला उत्तेजन देण्याचें त्यांचें धोरण त्यांनीं तसेंच चालू ठेवलें. त्याची परिणति १९३८ सालीं म्युनिचमध्यें झाली. म्युनिच म्हणजे ब्रिटन आणि फ्रान्स यांनीं हिटलर आणि मुसोलिनी यांच्याबरोबर केलेला समझोता होता आणि ह्या समझोत्याला प्रेरणा आणि उत्तेजन देण्याचें कार्य अमेरिकेच्या त्यावेळच्या राज्यकर्त्यांनीं केलें होतें.

हें अदूरदृष्टिचें धोरण कशावर आधारलेलें होतें? हिटलरचें युद्धयंत्र पूर्वेकडे वळविणें हा हेतू त्याच्या वुडाशीं होता. रशियांत भांडवलशाहीची पुनःस्थापना करुन सोविएत जनतेला गुलाम बनविण्याचें जें कार्य १९१८-२० मध्यें हस्तक्षेप करणारे पार पाडूं शकले नव्हतें तें कार्य हिटलरच्या टोळधाडींच्या मदतीनें पार पाडावें ह्या इच्छेवर तें धोरण आधारलेलें होतें.

शिवाय जगांतील बाजारपेठांत जर्मन साम्राज्यशाहीची स्पर्धा अतिशय धोक्याची होऊ लागली होती, आणि म्हणून सोविएत युनियन विरुद्ध युद्ध केल्यानें जर्मन साम्राज्यशाहीच्या शक्ती देखील क्षीण होतील तर बरें अशी आशा देखील या साम्राज्यवादी कारस्थान्यांना वाटत होती.

हिटलरच्या टोळधाडींनीं सोविएत युनियनवर आपला दगाबाज हल्ला चढविला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं म्हणजे २३ जून १९४१ रोजीं, त्यावेळीं अमेरिकेचे सिनेटर असलेल्या हॅरी ट्रुमन यांनीं उद्गार काढले होते कीं "जर्मनी जिंकत असलेला आपल्याला दिसला तर आपण रशियाला मदत करावी आणि रशिया जिंकत असेल तर आपण जर्मनीला मदत करावी आणि अशा प्रकारें त्या दोघांना एकमेकांचे शक्य तेवढे जास्तींत जास्त लोक ठार करुं द्यावेत." याच्या मागोमाग सप्टेंबर १९४१ मध्यें ब्रिटिश मंत्री मूर-ब्रॅबॅझोन यांनीं कांहीं दोस्तांपुढें स्पष्ट सांगितलें कीं 'शत्रू' असलेल्या जर्मनीइतकाच सणसणीत मार 'दोस्त' असलेल्या रशियानें खावा अशी त्यांची अगदीं मनापासून इच्छा होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
मुख्य विजेता म्हणून बाहेर पडलें आणि दिसायला अजिंक्य असलेल्या हिटलरी युद्धयंत्राचा चक्काचूर करणारी मुख्य निर्णायक शक्ति सोविएत फौजच ठरली.

दुसऱ्या महायुद्धामुळें अनेक दूरगामी बदल जगांत घडून आले पण एक गोष्ट मात्र बदलली नाहीं. ती गोष्ट म्हणजे सोविएत युनियनचें शांततेवरचें प्रेम, हें प्रेम हाच सोविएतच्या धोरणाचा आधार होता आणि आजहि आहे.

जगांतील सामाजिक प्रगति आणि समाजसत्तावादी न्याय यांचें कार्य पुढें नेणारी महान् शक्ति म्हणून जे सोविएत युनियनकडे आशेनें आणि श्रद्धेनें पहातात त्यांनाच म्हणजे आपल्या मित्रांनाच केवळ उद्देशून नव्हे तर ज्यांना इतिहासाचें थोडेंफार ज्ञान आहे आणि या इतिहासाचे धडे विचारांत घेण्याची ज्यांची तयारी आहे अशा लोकांना उद्देशून आम्ही विचारतों. "तुम्हाला निर्विवाद सत्य असलेल्या पुढील गोष्टी माहित आहेत काय ?

जर्मनी आणि तिचे हस्तक हिटलर-विरोधी दोस्तराष्ट्रांविरुद्ध अपूर्व क्रौर्यानें युद्ध करीत होते आणि या युद्धाचा मुख्य वांटा (आणि तोच शेवटीं खऱ्या अर्थानें निर्णायक ठरला) सोविएत युनियनच्या सशस्त्र दलांना उचलावा लागत होता. सोवियत युनियनचे सर्वांत सुपीक सर्वांत समृद्ध, आणि सर्वांत उद्योगप्रधान असे प्रदेश पशुतुल्य शत्रू बेचिराख करीत होता, लुटून नेत होता आणि नष्ट करीत होता. अशा स्थितींत ज्या लष्करी मदतीच्या योगें सोविएत युनियनवरचा भार बराच कमी झाला असता ती लष्करी मदत त्यावेळीं देण्यांत आली नाही. "दुसरी आघाडी" हा शुद्ध बनवाबनवीचा प्रकार ठरला. जेथे लढल्याजें रशियन जनतेला कांहीं भरीव मदत झाली असतीं अशीं सर्व ठिकाणें नेमकीं सोडून इतर कोणत्याहि ठिकाणीं "दोस्त राष्ट्रें" लढत होतीं. आणि जेव्हां पाशवी शत्रूच्या पाठीचा कणा मोडून पडला तेव्हां कुठें अगदीं उशीरां "दुसरी आघाडी" अवतरली.

सोव्हिएत युनियनला हिटलरी गिधाडापासून जेवढें गंभीर नुकसान सोसावें लागलें तेवढें सोविएतच्या दोस्तराष्ट्रांपैकीं एकालाहि सोसावें लागलें नाही, आणि तरीहि सोव्हिएत युनियननें पराभूत जर्मनीच्या बाबतींत जशी न्यायाची आणि लोकशाहीची भूमिका स्वीकारली आहे तशी त्यांच्यापैकीं एकानेंहि स्वीकारली नांही. फॅसिझमचा कायमचा नायनाट होवो पण स्वतंत्र आणि लोकशाही जर्मनी अस्तित्वांत येवो आणि चिरायु होवो...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
"हिटलरसारखे लोक येतात आणि जातात पण जर्मन जनता आणि जनता आणि जर्मन राज्य टिकून रहातात" असें जे. व्ही. स्तालिननें १९४२ सालींच म्हटलें होतें. जर्मन प्रश्नाबाबत युद्धोत्तर काळांत सोव्हिएत युनियननें स्वीकारलेल्या सर्व धोरणाच्या मुळाशीं हो सुज्ञ घोषणा आहे. विजयदिनापासून संयुक्त, शांततापिय, स्वतंत्र आणि लोकशाहीवादी अशा जर्मनीसाठीं केवळ सोव्हिएत युनियनच अविश्रांत झगडत आहे.

तें कां ? कारण असा जर्मनीच युरोपमध्यें आणि जगभर शांतता नांदविण्याची विश्वसनीय हमी देऊं शकतो आणि शांतता हें तर समाजसत्ताक राज्याच्या सर्व परराष्ट्रीय धोरणाचें मुख्य उद्दिष्ट आहे; कारण जगांतील कोणत्याहि जनतेच्या वाबतींत तिचा लोकशाही विकास व्हावा या व्यतिरिक्त दुसरी इच्छा सोविएत जनतेच्या अंतःकरणांत असूंच शकत नाहीं; कारण समाजसत्ताक राज्याचें धोरण कोणत्याहि राष्ट्रांबाबत सूडबुद्धीच्या भावनेचा आधार घेऊं शकत नाहीं; कारण छोट्या-बड्या सर्व राष्ट्रांत सहकार्य आणि मैत्री टिकविण्याचें धोरण ठेवणें, सर्व कामकरी जनतेविषयीं बंधुभावपूर्ण ऐक्याची भावना बाळगणें ही समाजसत्तावादाच्या जागतिक दृष्टिकोनाची, व म्हणून समाजसत्ताक सोविएत राज्याच्या धोरणाची, एक अढळ कोनशिला आहे.

आपल्या शौर्यशाली लढ्यानें सोविएत जनतेनें आणि तिच्या सेनेनें जर्मन जनतेसहित युरोपच्या सर्व राष्ट्रांना हिटलरी दास्याच्या अवमानित आणि भयप्रद जिण्यांतून मुक्त केलें. कित्येक युरोपियन राज्यांनीं आपल्या मुक्तिदात्यांशीं दोस्ती करण्याचा मार्ग चोखाळला आहे आणि सोविएत युनियनशीं निकटच्या दोस्तीचे करार केले आहेत. या देशांशीं सोविएत युनियन आर्थिक आणि सांस्कृतिक सहकार्य करीत आहे. त्यांच्याशीं सोविएत युनियननें कित्येक व्यापारी तह आणि करार केले आहेत. त्यांवर सही करणाऱ्यांनीं अनेकवेळां एकमतानें जाहिर केल्याप्रमाणें हे तह आणि करार म्हणजे राजकीय व आर्थिक दोन्ही बाबतींत समतेचें तत्त्व कसोशीनें लागू करुन त्या आधारावर परस्परांनीं स्वीकारावयाच्या जबाबदारीचीं आदर्श उदाहरणें आहेत.

महान चीनी प्रजाराज्याशीं सोविएत युनियननें बंधुभावपूर्ण दोस्तीचा करार केला आहे. या महान राज्याशीं तसेंच शेजारच्या इतर आशियाई राज्यांशीं सोविएत युनियननें केलेल्या सर्व करारनाम्यांत हेंच वैशिष्ट्य प्रामुख्यानें दिसून येतें हें अर्थात् सांगण्याची गरज नाहीं.
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्धापासून फायदा कुणाचा होतो ?

वस्तुस्थिति ही अशी आहे. सर्व राष्ट्रांच्या निरपवाद समतेच्या तत्त्वासाठीं आपण लढत असल्याचा असा बिनतोड पुरावा समाजसत्ताक राज्यानें दिला आहे. परंतु असें असूनहि भोळ्या व अज्ञान लोकांना फसविण्यासाठीं दुष्ट आणि निंदाखोर प्रचार करणारे लोक खुशाल सांगूं शकतात कीं हेंच राज्य इतर देशांना, इतर राष्ट्रांना गुलाम करण्यासाठीं त्यांच्यावर आक्रमण करण्याचा विचार मनांत बाळगून आहे.

गेल्या ३६ वर्षांच्या इतिहासाचे एवढे धडे आहेत, ही सर्व वस्तुस्थिति डोळ्यांसमोर आहे तरी तें सर्व धाब्यावर बसवून समाजसत्ताक राज्याच्या आरंभींच्या दिवसांत जे आक्रमकतेचे आरोप आम्ही ऐकत होतों तेच खोटे आरोप सोव्हिएत युनियनवर आजहि केले जात आहेत याचें कारण काय ?

पूर्वीप्रमाणें आजहि "स्वातंत्र्य आणि लोकशाहीचें रक्षण" "मानवी हक्कांचें रक्षण" आणि अशाच इतर ढोंगी घोषणांच्या पांघरुणाखालीं तसलीच दुष्ट मोहीम आजहि चालू आहे याचें कारण काय ?

उत्तर अगदीं साधें आहे : इतर देशांना व राष्ट्रांना गुलाम करण्यासाठीं, विशेषतः सोविएत भूमिला आणि ज्यांनीं भांडवलदारी गांजणूकीचें आणि पिळणूकीचें जूं कायमचें झुगारुन दिलें आहे अशा राज्यांना गुलाम करण्यासाठीं, यापूर्वीहि साम्राज्यवाद्यांनीं लुटारु युद्धें केली आहेत व आजहि तशा युद्धांची ते तयारी करीत आहेत. आणि पूर्वीप्रमाणें आजहि आपल्या युद्धतयारीवर पांघरुण घालण्यासाठीं ते या गलिच्छ प्रचाराच्या धुळवडीचा उपयोग करीत आहेत.

खरें पाहिलें तर सोव्हियत युनियनला अशा लुटारू युद्धांची गरज तरी कां भासेल ? कुठले उद्देश साध्य करण्यासाठीं सोव्हियत युनियन लढाईची खटपट वा तयारी करील ? कुठें, कोणाबरोबर, कशासाठीं ?

प्राचीन रोममध्यें गुन्हेगार शोधतांना रोमचे कायदेविषयक तज्ज्ञ एक नियम लक्षांत ठेवीत असत. तो नियम हा कीं एखाद्या गुन्ह्यानें ज्याचा फायदा होत असेल त्यानेंच तो गुन्हा केला असला पाहिजे.

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
हा युद्ध नियम आपण आपल्या कोळीला लागू करु आणि युद्धापासून फायदा कोणाचा होतो पाहूं.

याचें उत्तर अधिकृत सरकारी आंकड्यांत मिळतें. दुसऱ्या महायुद्धाच्या ५ वर्षांत अमेरिकन मक्तेदार कंपन्यांना १०७ अब्ज डॉलर इतका नफा झाला. १९४० मध्यें अमेरिकेच्या सर्व कारखानदारी धंद्यांत एकूण जेवढें मूळ भांडवल गुंतविलेलें होतें त्याच्या तिप्पट ही नफ्याची रक्कम आहे.

युद्ध संपतांच युद्धजन्य 'तेजी' देखील मंदावणें अपरिहार्य झालें. अशा तऱ्हेनें युद्धकाळांतले नफे कमी होऊन आर्थिक उत्पात, मंदी आणि अरिष्ट ओढवण्याची शक्यता अमेरिकन भांडवलदारांपुढें हत्त म्हणून उभी राहिली.

त्यांच्यापुढें प्रश्न आला कीं हा धोका टाळायचा कसा ?. पण सुटकेचा मार्गहि अगदीं लवकर शोधून काढण्यांत आला. दुसऱ्या युद्धाची जागा शीत-युद्धानें घेतली. याचवेळीं "लाल साम्राज्यशाही" विषयींची तकथा जुन्या अडगळीतून बाहेर काढण्यांत आली आणि ती या नव्या युद्धाची कोनशिला बनली. हा देखील एक किफायतशीर धंदाच ठरला. १९४६-५० या पहिल्या पांच युद्धोत्तर वर्षांत अमेरिकन मक्तेदारांनीं १५८ अब्ज डॉलर्स एवढा नफा कमावला. धंद्याला मिळालेलें हें "उत्कृष्ट वळण" टिकवणें आणि वाढवित नेणें आवश्यक होतें आणि म्हणून अमेरिकन साम्राज्यशाहीनें कोरियन जनतेविरुद्ध आक्रमक युद्ध पुकारलें.

हें आक्रमण, सतत चिघळवण्यांत येणारा युद्धपोषक मनःक्षोभ, नव्या महायुद्धाच्या तयारीसाठीं सरकारकडून खर्च होणारी अफाट रक्कम आणि शस्त्रास्त्रवाढीची मोहीम—या सर्व गोष्टींमुळें मॉर्गन, मेलन, डयु पॉंट आणि रॉकफेलरसारख्या अमेरिकन मक्तेदारांच्या तिजोरींत सोन्याचा पाऊसच ओतत होता. अमरिकेच्या भावनियामक कचेरीचे एक वेळचे डायरेक्टर श्री. चेस्टर बाउल्स यांनीं बड्या कंपन्यांच्या नफ्याविषयीं अधिकृत आकड्यांच्या आधारें हिशेब करून पुढील माहिती 'न्यु यॉर्क मॅगेझिन' मध्यें प्रसिद्ध केली होती—१९३९ मध्यें हा नफा (कर वजा न करतां) ६५० कोटी डॉलर्स होता, तो वाढून १९४४ मध्यें २४ अब्ज ३० कोटी डॉलर्सवर आला आणि १९५१ मध्यें तर ५० अब्ज डॉलर्सवर त्याची मजल गेली. याचा अर्थ युद्धकाळांतील जास्तींत जास्त नफ्याशीं तुलना करतां या कंपन्यांचा नफा शेकडा २०० टक्क्याहून अधिक वाढला.

१९५२ आणि १९५३ मध्यें देखील नफे वाढतच गेले. मिळालेल्या आंकड्यावरुन दिसून येतें कीं ४१६ अमेरिकन मक्तेदार कंपन्यांचे नफे १९५२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
च्या दुसऱ्या तिमाहीशी तुलना करता १९५३ च्या दुसऱ्या तिमाहीत शेकडा २५ टक्क्यांनीं वाढलें. धंद्यांला सर्वांत जास्त चालना कशानें मिळत असेल तर ती युद्धाच्या मनोवृत्तिमुळें, असें अमेरिकन व्यापारमंडळाचें मुखपत्र 'नेशन्स बिझनेस' यानें म्हटलें हा कांही योगायोग नाही.

परंतु युद्ध म्हणजे आपली श्रीमंती अधिक वाढविण्याचे साधन असें समजणारे 'धंदेवाले' सोवियत युनियनमध्यें अजिबात नाहीत. ऑक्टोबर क्रांतिनें सोव्हियत युनियनमधून या वर्गाची कायमची हकालपट्टी केली आहे. युद्धापासून ज्याचा कवडीइतका फायदा होईल अशी एकसुद्धा व्यक्ति सोविएत युनियनमध्यें नाही. अशा व्यक्तींचे सबंध वर्ग वा गट तर सोडूनच द्या. सोविएत युनियनल "युद्धाच्या मनोवृत्ति" च्या सहाय्यानें "धंदा" चालू ठेवण्याची मुळींच गरज नाही. सोविएत जनता आज कोट्याधीश आहे परंतु नफ्याचा शोध ही कांही तिच्या व्यवहाराची प्रेरक शक्ति नाही. तिचें सारें कार्य संहाराच्या तयारीवर केंद्रित झालेलें नसून महान् रचनात्मक प्रयासांवर केंद्रित झालें आहे. ३६ वर्षांच्या आपल्या आयुष्यांत सोव्हिएत युनियननें बाहेरच्या सर्व अडथळ्यांना न जुमानतां कित्येक शतकांची प्रगति केली आहे. सोविएत जनता ही नवनिर्मिती करणारी जनता आहे. स्वतःच्या देशांत कम्युनिझम् निर्माण करण्याच्या महान् ध्येयानें प्रेरित होऊन मानवाच्या हितासाठीं सर्व समाजजीवनाची पुनर्घटना करण्याच्या भव्य कार्याला तिनें स्वतःला वाहून घेतलें आहे. आक्रमणाचा किंवा लुटारू युद्धाचा ती विचार तरी करूं शकेल काय ?

जनतेला कुठेंहि आणि कधींहि आक्रमक युद्धाची गरज नव्हती. अमेरिकन, ब्रिटिश, फ्रेंच आणि इतर कोणत्याहि जनतेला आक्रमक लुटारू युद्धांचा तिटकाराच आहे याची सोव्हिएत जनतेला संपूर्ण खात्री आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या झेंड्याखालीं कोरियामध्यें जसें विध्वंसक युद्ध चालविण्यांत आलें तशा प्रकारचें आक्रमक लुटारू युद्ध होऊं द्यायचें कीं नाहीं हें ठरविणें कोणत्याहि देशांत जनतेच्या हातीं असेल तर अशीं युद्धें होणेंच अजिबात अशक्य होईल. संहाराच्या खाईंत लोकांना लोटूं पहाणाऱ्या मूठभर भांडवलदारांच्या तिजोरींत भर टाकण्यासाठीं स्वतः मरायला किंवा मारायला कुठलेहि लोक जगांत तयार होणार नाहींत.

सोव्हिएतची समाजपद्धति व राज्यपद्धति याच मुळीं अशा प्रकारच्या आहेत कीं त्यांत कोणतेहि प्रश्न, विशेषतः युद्ध आणि शांततेचे प्रश्न, जनतेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
वगळून किंवा जनतेच्या इच्छेविरुद्ध सोडविले जाणेच शक्य नाही. ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. सोव्हिएत युनियनमध्यें सत्ता म्हणजे जनता आणि जनता म्हणजे सत्ता. मग अशी सत्ता आणि अशी जनता स्वतः होऊन कांहीं आक्रमक उद्दिष्टांच्यामागें लागतील अशी कल्पना तरी कशी करतां येईल ?

परंतु स्वतःच्याच देशाला नव्हे तर साऱ्या जगाला हुकूम सोडण्याचें कार्य इतिहासानें आपल्याकडे सोंपवलें आहे असें जाहीर करणारे पुढारी देखील कांहीं राष्ट्रांत असतात. केवळ या कारणामुळेंच कमी अधिक काळानंतर त्यांना विरोध होऊं लागतो आणि त्यांतच त्यांचा विनाश ठेवशेला असतो. अलिकडच्या काळांत हिटलर जर्मनी असा दावा करीत असे आणि त्याहून दूरच्या भूतकाळांत डोकांवलों तर नेपोलियनच्या साम्राज्याची देखील अशा प्रकारच्या बढायांबद्दल ख्याति असलेली आपल्याला दिसून येते. नेपोलिनच्या धर्तीवर देशांचीं नाकेबंदी करण्याच्या कल्पनेला कांहीं लोकांकडून जोराचा पाठिंबा मिळतो आणि "लढाईचा कायदा" यांसारखे कायदे करणें, जे निमूटपणें नमतें घेत नाहींत अशांची "काळी यादी" तयार करणें वगैरे गोष्टींत तो पाठिंबा व्यक्तहि होतो हा केवळ योगायोग नव्हे. नेपोलियनी धर्तीच्या आर्थिक नाकेबंदीचें या गृहस्थांना आकर्षण वाटतें, कारण आक्रमणाचें तें एक शस्त्र आहे अणि सोव्हिएत युनियन, महान चीनी जनतेचें प्रजाराज्य आणि जनतेच्या लोकशाहीची स्थापना झालेली युरोपियन राष्ट्रें यांच्याविरुद्ध तें शस्त्र वापरण्याचा पराकष्टेचा प्रयत्न ते करीत आहेत.

परंतु आक्रमणाचें शस्त्र आक्रमण करणाऱ्यांवरहि उलटत असतें. इतिहासांत याचीं अनेक उदाहरणें आहेत. ज्या देशांत जगांतली एक तृतीयांश लोकसंख्या रहाते, ज्या देशांजवळ स्वतःची अत्यंत समृद्ध अशी साधन संपत्ति आहे आणि एकमेकांना सहाय्य करुन आर्थिक विकासांत सर्वसाधारण उन्नति घडवून आणण्याच्या प्रामाणिक इच्छेनें ज्या देशांमध्यें निकटचें सहकार्य होत आहे अशा देशांना आर्थिक नाकेबंदीनें "गळफांस लावणें" हें कार्यच मुळांत असें होतें कीं तें पार पाडणें अशक्य झालें. सोव्हिएत युनियन, चीन आणि युरोपमधील जनतेची लोकशाही राष्ट्रें यांची आर्थिक नाकेबंदी करण्याच्या प्रयत्नांचा परिणाम एवढाच झाला कीं त्यामुळें आर्थिक दृष्ट्या या देशांचे संबंध जास्त दृढ होण्यास मदत झाली आणि व्यापक प्रमाणावर परस्पर-सहाय्याची व्यवस्था पद्धति होऊन त्याचे अत्यंत उत्तम परिणामहि झाले. संयुक्त राष्ट्रांच्या युरोपविषयक आर्थिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
समितिला उदाहरणार्थ या गोष्टीची कबूली द्यावी लागली. १९५३ मध्ये या समितिनें प्रसिद्ध केलेल्या "युरोपमधील आर्थिक परिस्थितिचें परीक्षण" या पुस्तिकेंत "युरोपची विभागणी" या शीर्षकाखालीं एक अत्यंत बोधप्रद प्रकरण लिहिलें आहे. या "विभागणी" चे पश्चिम युरोपच्या देशांवर कसें प्रतिकूल परिणाम झालें हें या प्रकरणांत स्पष्ट दाखवून दिलें आहे. परीक्षणांत म्हटलें आहे कीं पश्चिम युरोपियन देशांचें हें नुकसान म्हणजे पूर्व युरोपियन देशांच्या दृष्टिनें फायदाच ठरला.

"शीतयुद्धा" चा अविभाज्य भाग असलेल्या आर्थिक नाकेबंदीची फलश्रुति ही अशी आहे. ह्या प्रयोगाच्या कर्त्यांच्या आणि पाठीराख्यांच्या दृष्टीनें ही फलश्रुति बरीच दुःखदायक आहे हें कबूल केलें पाहिजे.

सोव्हिएत युनियनविषयीं बोलायचें तर परस्परांस फायदेशीर अशा अटींवर आणि संबंधित पक्षांच्या समतेच्या नात्याच्या आधारावर जे देश व्यापार करायला तयार असतील त्या सर्वांशीं अत्यंत निकटचें सहकार्य करणें हेंच परराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रांतलें सोविएत युनियनचें धोरण आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुलनेनें वस्तुंचें ज्ञान होतें

सोव्हिएत् युनियनच्या शत्रूंनीं पुढील प्रश्नांची देखील उत्तरें द्यावयास हवीं होतीं : आज सोव्हिएत् युनियन प्रचंड जलविद्युत् कारखाने, निवासस्थानें आरोग्यमंदिरें आणि विश्रांतिगृहें यांच्या बांधणीवर, शांततामय रचनेच्या कार्यावर अफाट प्रमाणावर भौतिक साधनें आणि श्रमशक्ति खर्च करीत आहे; युद्धाची तयारी करीत असलेलें राज्य अशा कार्यावर एवढा अफाट खर्च करील हें कदापि शक्य आहे काय ? अन्न, कपडा, पादत्राणें व इतर जीवनोपयोगी मालाच्या किंमतींत सोव्हिएत् युनियननें अल्पावकाशांत सहा वेळां कपात केली आहे; युद्धतयारींत गुंतलेल्या राष्ट्राला हें शक्य आहे काय ? सोव्हिएत् युनियन सांस्कृतिक विकासासाठीं प्रचंड प्रमाणावर खर्च करीत आहे, उच्च आणि माध्यमिक शिक्षणाच्या नव्या नव्या संस्था उघडण्यासाठीं व या संस्थाकरितां मॉस्को युनिव्हर्सिटीच्या नव्या भव्य प्रासादासारख्या सुंदर इमारती बांधण्यासाठीं जलद, सतत आणि सढळ हातानें अधिकाधिक पैसा खर्च करीत आहे. युद्धाची तयारी करणारें राज्य असें करील काय ?

तत्वज्ञानांत एक जुनें सुभाषित आहे—"तुलनेनें वस्तूंचें ज्ञान होतें." आपण स्वतःला विचारुन बघूं या : युद्धोत्तर काळांत अटलांटिक गटाच्या देशांत कितीशा विश्वविद्यालयाच्या इमारती बांधण्यात आल्या आहेत ? शिक्षण संस्थावर एकंदर किती पैसा खर्च झाला आहे ? लोकांच्या सांस्कृतिक गरजा भागविण्यासाठी किती खर्च झाला आहे ? हातच्या कांकणाला आरशाची गरज नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर या देशांत जनतेच्या सांस्कृतिक गरजा भागवण्याच्या कार्यावर पाणीच सोडण्यांत आले आहे. कामगार, शेतकरी दुकानदार यांच्याकडून, एका शब्दांत सांगायचें तर कर भरणाऱ्या सामान्य माणसांकडून राबणाऱ्या जनतेकडून, राबणाऱ्या जनतेकडून या काळांत अब्जावधि डॉलर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
उकळण्यांत आलें आहेत आणि हा सारा अफाट पैसा शस्त्रास्त्रवाढ करण्यांत, कोरिया, इंडोचायना, मलाया आणि केन्याच्या जनतेविरुद्ध तिरस्करणीय युद्धें करण्यांत आणि तिसऱ्या महायुद्धाची तयारी करण्यांत ओतण्यांत आला आहे.

थोडी अधिक तुलना करण्याचें धाडस आपण करू. दुसऱ्या महायुद्धांत सोव्हिएत युनियनची जेवढी हानि झाली त्याच्या अल्पांशानें देखील हिटलर-विरोधी दोस्त राष्ट्रांपैकीं इतर कुणाची हानि झाली नव्हती.

तरीसुद्धा, क्रूर फॅसिस्ट पशूंनी सोव्हिएत युनियनवर केलेल्या जखमा केव्हांच भरून निघाल्या आहेत. जनतेचें राहणीमान युद्धपूर्व पातळीच्या पलीकडे केव्हांच जाऊन पोचले आहे. आणि देशाच्या विकासाची नवी अवस्था, जनतेच्या राहणीमानांत जलद आणि भरघोस सुधारणा होण्याची अवस्था सुरु झाली आहे. परंतु आपण दुसरा देश उदाहरणादाखल अमेरिका घेऊं. अमेरिकेचें युद्धांत मुळींच नुकसान झालें नव्हतें आणि म्हणून देशाला पूर्वपदावर आणण्यासाठीं अमेरिकेला कांही प्रयास करण्याची गरज पडली नाही. परंतु तरीहि आज तेथें रहाणीचें मान युद्धपूर्व काळाच्या मानानें अमर्याद घसरलें आहे. असें कां ? कारण सोव्हिएत युनियन शांततेचें धोरण अंमलांत आणीत आहे तर सोव्हिएत युनियनपासून निर्माण झालेल्या तथाकथित "धोक्या" विषयीं प्रत्यहिं आरडाओरड करीत असलेले अटलांटिक गटाचे नेते शस्त्रास्त्रवाढीच्या मोहिमेनें स्वतःच्या जनतेची दुर्दशा करीत आहेत, एवढेंच नव्हे तर ज्या देशांच्या राज्य-कर्त्यांनीं या गटाच्या गाड्याला स्वतःला जुंपून घेतलें आहे त्या देशांच्या नागरिकांचीहि दुर्दशा करुन सोडीत आहेत.

१९५२ साली अमेरिकेंत लोकांच्या प्राप्तिपैकीं शेंकडा ३० टक्के पैसा करवसूलीच्या रुपानें काढून घेण्यांत आला. फ्रान्स आणि ब्रिटेनमध्यें हें प्रमाण अनुक्रमें शेंकडा ३९ आणि ४२ टक्के होतें. हा पैसा कशावर खर्च होतो ? उध्वस्त झालेल्या शेतांना मदत करण्यासाठीं तो खर्च होतो का ? किंवा लक्षावधि बेकारांकरिता मदत फंड उभारण्यासाठीं त्याचा उपयोग होतो का ? किंवा

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
सामाजिक व सांस्कृतिक गरजा भागविण्यासाठी तो खर्च होतो असे आहे का ? तसें मुळींच नाहीं, कारण अटलांटिक गटाच्या देशांत पैशाचा असा विनियोग करण्याची कल्पनाच मुळीं चमत्कारिक आणि निरर्थक वाटते, रावणाच्या जनते-कडून वसूल केलेले हे कोट्यावधि डॉलर वेगळ्याच कामासाठीं राखून ठेवले जातात. जून १९५३ मध्यें मिनियापोलिस येथें बोलतांना अध्यक्ष आयसेन-हॉवर यांनीं सांगितलें कीं अमेरिकेच्या मध्यसरकारनें खर्च केलेल्या प्रत्येक तीन डॉलरपैकीं दोन डॉलर युद्धकारणीं खर्च होत असतात. मग उत्तर अटलांटिक गटांतील राष्ट्रांचा युद्धखर्च १९५० सालीं १८ अब्ज डॉलर होता तो १९५२-५३ च्या आर्थिक वर्षांत ६३ अब्ज डॉलरपर्यंत जाऊन थडकला यांत नवल कसलें ?

उलट याच १९५२ व ५३ या वर्षांमधील सोविएत युनियनचीं अंदाज-पत्रकें आपण पाहूं. या अंदाजपत्रकांत लष्करी खर्चाचा वांटा वाढला काय ? नाहीं, तो वाढला नाहीं. एवढेंच नव्हे तर १९५२ सालीं संरक्षणावरचा खर्च उकूण अंदाजपत्रकापैकीं शेंकडा २३·६% एवढा होता तो १९५३ मध्यें २०·८% वर आला.

असें कां ? याचाहि खुलासा तोच आहे. सर्व सोविएत जनतेप्रमाणें सोविएत सरकारच्या दृष्टीनेंहि, शांतता बळकट करणें व सर्व राष्ट्राच्या सुरक्षितेची खात्री करणें हा कांहीं डावपेंचांचा किंवा मुत्सद्दगिरीच्या हालाचालींचा प्रश्न नाहीं. सोव्हिएत युनियनच्या परराष्ट्रीय धोरणाचें तें सर्वसामान्य सूत्र आहे.

आज साऱ्या जगाच्या डोळ्यांसमोर सोव्हिएत देशाच्या अर्थव्यवस्थेंत जें कांहीं घडत आहे त्याहून याचा जास्त स्पष्ट आणि विनतोड असा दुसरा पुरावा असूं शकेल काय ? कम्युनिझमच्या दिशेनें चाललेल्या सोविएत युनियनच्या प्रगतिची ही नवी अवस्था आहे आणि पूर्वीच्या समाजसत्ताक रचनेच्या सबंध क्रमांत त्याची पूर्वतयारी होऊन गेली आहे. तंत्र दृष्ट्या पूर्णत्वास पोंचलेले सामर्थ्यशाली जड उद्योगधंदे निर्माण केल्यानंतर आतां सामान्य जीवनोपयोगी मालाची पैदास पाढविण्यासाठीं सोव्हिएत जनता निर्णायक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
उपाययोजना करू शकते. शेती, उद्योगधंदे आणि व्यापार या क्षेत्रांत सोव्हिएत सरकारनें आणि सोविएत युनियनच्या कम्युनिस्ट पार्टीनें जीं पावलें अलीकडे टाकलीं आहेत त्यांचा अर्थ हा आहे.

साधन संपत्ति, लोक, यंत्रसामुग्री आणि पैसा या सर्वांचा प्रचंड ओघ शेतीकडे वळविण्यांत आला आहे जेणेंकरुन शेतीची जबरदस्त उन्नति व्हावी आणि सामुदायिक शेतीच्या पद्धतीचे जे फायदे आहेत त्यांचा जास्त विस्तृत उपयोग व्हावा. खाद्यपदार्थ, कपडा, पादत्राणें आणि इतर सामान्य जीवनोपयोगी माल तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांचे शेंकडो नवे कारखाने देशभर उभारले जात आहेत. आधींपासून असलेल्या कारखान्यांची पुनर्घटना करून ते जास्त मोठे करण्यांत येत आहेत. विमानें, संरक्षणसामुग्री, यंत्रें आणि धातु तयार करणाऱ्या धंद्यामधील तसेंच इतरहि कांही धंद्यामधील गिरण्यांना व कारखान्यांना त्यांच्या नेहमींच्या उत्पादनाव्यतिरिक्त सामान्य जीवनोपयोगी मालाचें (सायकलीं, रेफ्रिजरेटर, पलंग, आल्युमिनियमची भांडीं वगैरे) उत्पादन संघटित करण्याचें हुकूम देण्यांत आले आहेत.

अर्थात साऱ्या आंतरराष्ट्रीय परिस्थितिपासून दूर राहून आणि विरोधी आक्रमक शक्तींच्या सोव्हिएत-विरोधी योजनांकडे व कृतींकडे काणाडोळा करून सोव्हिएत युनियननें युद्धसाहित्याचें सर्व उत्पादन बंद केलें आहे आणि केवळ शांततामय उत्पादनच चालू ठेवलें आहे, सोव्हिएत युनियनमध्यें सर्व दारुगोळ्याचें आता खत बनवण्यांत आलें आहे किंवा साऱ्या तलवारी मोडून त्यांचे नांगर बनवण्यांत आले आहेत असा याचा मुळींच अर्थ नाहीं. " शीतयुद्ध " चालविणाऱ्यांच्या धोरणामुळें दुर्दैवानें ही गोष्ट अद्याप शक्यतेच्या कोटींतील नाहीं. सार्वत्रिक संहाराच्या सर्व शस्त्रांवर बंदी घालण्यांत यावी आणि अशी बंदी खरोखर अंमलांत येण्यासाठीं त्यावर कडक असें आंतरराष्ट्रीय नियंत्रण असावें यासाठी सोव्हिएत युनियन अविश्रांत आणि अविरत झटत आलें आहे; शस्त्रास्त्रवाढीची मोहीम थांबविण्यात यावी अशी मागणी सोविएत युनियन नेहमींच करीत आलें आहे—परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
अटलांटिक सनदेच्या सदस्यांनीं त्या सर्व मालमत्ता पुन्हा जिंकल्या आहेत. म्हणून, सोविएत युनियनचे संरक्षणखातें आतां पदार्थ थंड ठेवणाऱ्या यंत्र साधनांचेच केवळ उत्पादन करीत आहे किंवा वैमानिक उत्पादनाचे खातें केवळ अल्युमिनीयमची भांडीं तयार करण्यांत आतां गुंतलें आहे असें समजणें हास्यास्पद होईल. परंतु ही गोष्ट खरी आहे कीं सोव्हिएतच्या उद्योग धंद्यांची ताकद एवढी वाढली आहे कीं जनतेच्या रहाणीमानांत झपाट्यानें सुधारणा करण्यासाठीं लागणाऱ्या सर्व वस्तूंचे उत्पादन ते करू शकतात आणि त्याचवेळीं सोविएत जनतेला निर्स्धास्तपणें आणि शांतपणें आपलें शांततामय कार्य चालू ठेवतां यावें यासाठीं लागणाऱ्या सर्व वस्तूंचें उत्पादनहि ते करुं शकतात.

येत्या २-३ वर्षांत जनतेला अन्नाचा आणि कारखानदारी मालाचा विपुल पुरवठा करण्याचें कार्य सोविएत युनियननें हातीं घेतलें आहे आणि तें कार्य आज झपाट्यानें आणि यशस्वी रीतीनें पार पाडण्यांत येत आहे. जनतेला लागणाऱ्या वस्तूंचा मुबलक पुरवठा आणि त्याच्याच जोडीला किंमतींत सतत कपात करण्याचें धोरण याचा अर्थ खऱ्या पगारांत आणि सामुदायिक शेतकऱ्यांच्या उत्पन्नांत झपाट्यानें वाढ होते, लोकांच्या वाढल्या गरजा भागवल्या जातात आणि त्यांच्या रहाणींत निर्णायक सुधारणा होते.

सोव्हिएत राज्याच्या प्रचंड शक्ती आज या दिशेनें कामास लागल्या आहेत. सोव्हिएत जनता या मार्गानें आज आपलें कार्य पुढें नेत आहे. 'नेशन्स बिझिनेस' या पत्रानें म्हटल्याप्रमाणें 'युद्धाच्या मनोवृत्ति' खेरीज अमेरिकन मक्तेदारांना दुसरा मार्ग नसेल पण सोव्हिएत युनियनला वरील गोष्टींसाठीं असल्या 'युद्ध मनोवृत्ति' ची कांहीं गरज आहे कां ? खरें म्हणजे अशी मनोवृत्ति अशा स्थितींत संभवूं शकते का ? सोव्हिएत जनतेनें आणि तिच्या राज्यानें आपल्या शिरावर जी महान कार्यें घेतली आहेत तीं पार पाडण्यासाठीं चिरस्थायी आणि सुस्थिर शांतता ही पहिली आणि अनिवार्य अशी अट आहे हें स्पष्ट नाहीं काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
आजच्या काळांत युद्धें सुरू कां होतात आणि तीं लढविली कां जातात हा एकच प्रश्न आपण विचारला तरी आक्रमकांनीं सोव्हिएतची बदनामी करणारा जो प्रचार चालविला आहे त्याचा मूर्खपणा आपल्या लक्षांत येईल.

सोविएत युनियनला अधिक मुलुख बळकावण्याची गरज आहे काय ? पृथ्वीच्या भूपृष्ठापैकीं एक षष्ठांश जमीन सोव्हिएत राज्यांत आहे. त्यांतील उपयुक्त जमीनीच्या विस्तारांत दरवर्षी सतत वाढती आणि मोठाली भर टाकतील अशा प्रचंड विकास योजनांवर सध्या काम चालू आहे. परका मुलुख बळकावून नव्हे तर अशा तऱ्हेनें निसर्गाची पुनर्रचना करणारे विधायक श्रम करून सोव्हिएत जनता संपत्तिनिर्मितीची नवी साधनें मिळवीत आहे.

कच्च्या मालाची पैदास करणारे प्रदेश आणि तयार माल खपविण्यासाठीं बाजारपेठा काबीज करण्याच्या अधाशी खटपटीमुळें भांडवलदारी राष्ट्रांत तीव्र स्पर्धा सुरू होते आणि भयानक लढाया सुरू होण्यास ही स्पर्धा अनेकदां कारणीभूत झाली आहे हा इतिहासाचा दाखला आहे.

कच्च्या मालाच्या बाबतींत सोव्हिएत युनियनची स्थिति काय आहे ? झारशाहीच्या अमदानींत जिला स्पर्श झाला नव्हता अशा अफाट नैसर्गिक संपत्तीची सोव्हिएतच्या अमदानींत तपासणी झाली आहे आणि ती संपत्ति आतां जनतेच्या हातीं आली आहे. पाटबंधाऱ्यांच्या व पुनर्रचनेच्या इतर नव्या व प्रचंड विकासयोजनांमुळें ह्या अफाट राष्ट्रीय संपत्तींत अनेकपटीची भर पडत आहे.

कच्चा मालाची पैदास करणाऱ्या प्रदेशांची सोव्हियत युनियनला गरज नसेल पण आपला माल खपविण्यासाठीं त्याला बाजारपेठांची मात्र गरज आहे असें तरी आहे कां ? कपडा, यंत्रसामुग्री, अन्नधान्य यांची किफायतशीर विक्री जेथें करतां येईल अशा बाजारपेठा आपल्या शेतीला आणि उद्योगधंद्यांना मिळवून देण्यासाठीं परक्यांचा मुलूख बळकावण्याची सोव्हियत युनियनला गरज आहे असें तरी आहे का ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण मुद्दा हा आहे कीं सोविएत युनियनमध्ये उत्पादनाची अरिष्टे उद्भवत नाहीत आणिउद्भवूंच शकत नाहीत. समाजसत्तावादी अर्थव्यवस्था आणि उत्पादनाची साधनें व उपकरणें यांवरील समाजसत्ताक मालकी हा सोव्हिएत युनियनचा आर्थिक पाया आहे. भांडवलदारी चढाओढ, बाजारपेटेंतली बेबंदशाही, "जादा" लोकवस्ती, बेकारी आणि अरिष्टें—या गोष्टी सोवियत युनियनमध्यें नाहीत आणि असूंहि शकत नाहीत. सबंध राष्ट्रीय अर्थव्यवस्था ही एका सरकारी योजनेला बांधलेली असते. सोवियतच्या अंतर्गत बाजारपेठेची क्रयशक्ति जवळ जवळ अमर्याद आहे कारण जनतेची सुस्थिति, तिची रहाणी आणि उपयोग यांत सतत वाढती सुधारणा होत असते आणि वर सांगितल्याप्रमाणें, यापुढें विकासाच्या नव्या अवस्थेंत ही सुधारणा अपूर्व वेगानें होणार आहे. यामुळेंच सोव्हिएत युनियनमध्यें आर्थिक अरिष्ट येण्याचा संभव उरत नाहीं. लोकांच्या सतत वाढत्या भौतिक आणि सांस्कृतिक गरजा जास्तींत जास्त प्रमाणांत भागविणें हाच समाजसत्ताक उत्पादनाचा उद्देश असतो आणि या वाढत्या गरजांना धरून अगदीं आधुनिक तंत्राच्या आधारावर हें उत्पादन अखंड वाढत आणि सुधरत जातें.

अर्थात सोव्हिएत युनियन परदेशांशीं खुशीनें व्यापार करते पण त्यासाठीं बाजारपेठा बळकावण्याची त्याला गरज नाहीं. परस्परांचा फायदा होईल आणि संबंधित पक्षांमध्यें संपूर्णपणें समतेचें नातें राहील या आधारावर सोव्हिएत युनियन कोणत्याहि राष्ट्राशीं व्यापार करायला तयार आहे अणि तसा व्यापार तें आज करीतहि आहे.

अशाहि स्थितींत सोविएत युनियनकडे शत्रुत्वानें पहाणारीं वृत्तपत्रें असें हास्यास्पद आणि धादांत खोटे आरोप करतात कीं सोविएत युनियन आक्रमणाची तयारी करीत आहे. कसलीहि गरज नसतां, यत्किंचित कारण नसतांना सामान्य अक्कलहुशारीचा अंश देखील न बाळगतां सोविएत युनियन युद्धास तयार होईल हें प्रथम या वृत्तपत्रांनीं आपल्या वाचकांना "पटवून" द्यावें आणि मग हा प्रचार हातीं घ्यावा !

पुस्तकालय
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्ध-मानवतेविरुद्ध सर्वांत मोठा गुन्हा

शांततामय विधायक कार्यांत गर्क असलेलें सोविएत युनियन हा शांततेचा जगांतला सर्वांत मजबूत बालेकिल्ला आहे. जिच्यांत कोट्यवधि लोक आज सामील झाले आहे आणि जिनें सारें जग आज व्यापून टाकलें आहे त्या महान् शांतता चळवळीला सोविएत युनियनची संपूर्ण सहानुभूति आणि पाठिंबा आहेत. राष्ट्रवर्ण कशाचाहि भेद न करतां, प्रत्येक राष्ट्राच्या कामकरी जनतेशीं बंधुभावपूर्ण ऐक्य राखण्याच्या तत्वांशीं निष्ठावंत असलेलें सोविएत युनियन केवळ स्वतःच्याच हिताकरितां नव्हे तर साऱ्या जगांतील जनतेच्या हिताकरितां शांततेच्या बाजूनें लढत आहे. स्वतःच्या सामर्थ्यांत संपूर्ण आणि अढळ विश्वास असलेलें सोविएत राज्य युद्धाविरुद्ध लढतें तें यासाठीं कीं मानवजातिला नव्या संकटापासून वाचवतां यावें आणि जागतिक संस्कृतिचें विनाशापासून रक्षण करतां यावें.

३६ वर्षांच्या काळांत सोविएत जनतेला शांतताप्रियतेचें आणि इतर सर्व राष्ट्रांविषयीं आदर बाळगण्याचें शिक्षण मिळालें आहे. सात वर्षाची मुलें सोविएत शाळांत जे पहिले शब्द शिकतात त्यांत **शांतता** हा पवित्र शब्द असतो. लेनिन आणि स्तालिन यांच्या शिकवणीप्रमाणें चालणारी सोव्हिएत युनियनची वृत्तपत्रें आणि रेडियो अविश्रांतपणें शांततेच्या विचारांचा पुरस्कार करतात आणि आक्रमणाचें, कोणत्याहि लुटारू युद्धाचे खरें स्वरूप उघडकीस आणतात. सोविएत लेखकांच्या कविता, कादंबऱ्या व नाटकें, सर्वांत शांततेची कल्पना ओतप्रोत भरलेली आहे. सर्व सोविएत चित्रपट शांततेचा संदेश देत असतात. कलावंत आणि शिल्पकार आपापल्या माध्यमाच्या द्वारें त्याच भावना आणि तेच विचार —शांततेचा ध्यास, व्यक्त करीत असतात.

सोविएत युनियनच्या 'आक्रमकते' विषयीं सदोदित आरडाओरड करणाऱ्या निंदाखोरांनीं एक गोष्ट करून दाखवावी. सोविएतमधील वाङमयीन कृती, नाटकें, चित्रपट, चित्रें, शिल्पकृती, किंवा निदान वृत्तपत्रांतील लेख वा

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
रेडियोवरून नांवे आणि आकडेवारी एवढी सोडून एक तरी असे उदाहरण देऊन दाखवून द्यावें कीं ज्यांत सोविएत जनतेला आक्रमणाची किंवा लुटारु युद्धाची हांक दिली आहे !

युद्धप्रचार करुं पहाणारा कोणताहि नागरिक सोविएत युनियनमध्यें देशाचा शत्रु समजला जाईल. १२ मार्च १९५१ रोजीं सोविएत युनियनच्या वरिष्ठ सोविएतनें एकमतानें शांतता रक्षणाचा कायदा मंजूर केला. त्यांत म्हटलें आहे :—

"राष्ट्रराष्ट्रांत शांतता आणि मित्रत्वाचे संबंध बळकट करणें हें ज्याचें उद्दिष्ट आहे अशा सोविएतच्या शांतता धोरणाच्या उच्च तत्त्वांना अनुसरून, सोविएत समाजसत्ताक प्रजाराज्यांच्या संघराज्याचें वरिष्ठ सोविएत,

हें मान्य करतें अशा कीं, एकाच पिढीच्या आयुर्मर्यादेंत जिनें दोन महायुद्धाच्या घोर आपत्तींचा अनुभव घेतला आहे अशा जनतेच्या सदसद्विवेक बुद्धि आणि न्यायबुद्धि, कांहीं राज्यांतील आक्रमक गटांकडून बेगुमानपणें होणारा युद्धप्रचार केव्हांहि सहन करूं शकत नाहींत, आणि अशा गुन्हेगारी प्रचाराला बंदी करून तो शासनार्ह ठरविण्याची साऱ्या पुरोगामी मानवजातिची इच्छा ज्यांत व्यक्त झाली आहे त्या दुसऱ्या जागतिक शांतता परिषदेच्या विनंतिपत्रकाला वरिष्ठ सोविएत पाठिंबा देतें.

" सोविएत समाजसत्ताक प्रजाराज्यांचें संघराज्यांच्या वरिष्ठ सोविएत असा निर्णय घेत आहे कीं,

१ कोणत्याहि स्वरूपांत होणाऱ्या युद्धप्रचारानें शांततेच्या कार्याला सुरुंग लागतो, नव्या युद्धाचा धोका निर्माण होतो आणि म्हणून असा प्रचार म्हणजे मानवतेविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हाच होय.

२ युद्ध प्रचार करणाऱ्या लोकांना मोठे गुन्हेगार समजून त्यांच्यावर खटला भरविण्यांत यावा. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
सोविएत युनियनच्या साऱ्या परराष्ट्रीय धोरणाशी या कायद्याचा प्रत्यक्ष संबंध आहे व त्या धोरणाशीं पूर्णपणें सुसंगत असाच तो कायदा आहे. कोणताहि सोविएत नागरिक आक्रमक युद्धाकडे सर्वांत घाणेरडा गुन्हा म्हणूनच पहातो. अणुशस्त्रांवर बंदी घालावी आणि ज्या राष्ट्राचें सरकार प्रथम त्या शस्त्रांचा उपयोग करील त्याला युद्ध गुन्हेगार म्हणून जाहिर करावें अशी मागणी करणाऱ्या जागतिक शांतता कौन्सिलच्या विनंति पत्रकावर सोविएत युनियनमध्यें ११५,२७५,९२० लोकांनीं सह्या केल्या. तसेंच एक वर्षांनंतर, सोविएत युनियन, चीन, अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स या पांच बड्या राष्ट्रांनीं शांततेचा करार करावा अशी मागणी करणाऱ्या विनंतिपत्रकावर सोविएत युनियनमध्यें ११७,६६९,३२० सह्या गोळा करण्यांत आल्या. म्हणजे देशांतील वयांत आलेल्या सर्व लोकांनीं या दोन्ही पत्रकांवर सह्या केल्या. शांततामय सह अस्तित्वाची कल्पना, भांडवलदारी पद्धति असलेली राष्ट्रें आणि सामजसत्ताक अर्थव्यवस्था असलेलीं राष्ट्रें यांच्यांत परस्परांस फायदेशीर असें शांततामय सहकार्य होण्याची कल्पना ही सोविएतच्या परराष्ट्रीय धोरणाची कोनशीला आहे.

ही कल्पना जे. व्ही स्तालिननें वारंवार पुढें मांडली होती. ९ एप्रिल १९४७ रोजीं हॅरोल्ड स्टासेनशीं झालेल्या संभाषणांत स्तालिननें म्हटलें होतें. "दोन समाजपद्धतींच्या सहकार्याची कल्पना लेनिननें प्रथमच मांडली. लेनिन हा आमचा गुरु आहे आणि आम्ही सोविएत जन त्याचे शिष्य आहोंत..." लेनिनचा हा उल्लेख अतिशय अर्थपूर्ण आहे. कारण युद्धप्रचार करणाऱ्यांना गुन्हेगार समजून त्यांच्यावर खटला भरण्यांत यावा असें जाहिर करणाऱ्या १९५१ च्या उपरोल्लेखित कायद्यांत, १९१७ सालच्या शांततेवरील जाहिरनाम्यांतील लेनिनच्या शब्दांचीच पुष्टि आणि पुनरावृत्ति आहे. शांततेवरील त्या जाहिरनाम्यांत प्रत्येक आक्रमक व लुटारू युद्ध म्हणजे "मानवतेविरुद्धचा सर्वांत मोठा गुन्हा" असल्याचें घोषित करण्यांत आलें होतें. अशा तऱ्हेनें, ऑक्टोबर क्रांतिच्या अक्षरशः दुसऱ्या दिवशीं सोवियत राज्याच्या संस्थापकानें सुरु केलेला शांततेचा लढा आज पुढें नेण्यांत येत आहे.

सोविएत राज्याच्या नेत्यांनीं नेहमींच ही भूमिका घेतली होती कीं समाजपद्धति भिन्न असल्या तरी भांडवलशाही आणि समाजसत्तावाद जगांत एकत्र नांदणें, आणि इतर देशांशीं सहकार्य आणि व्यापार करणे या गोष्टी

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
अगदीं शक्य आहेत; परंतु त्यासाठीं सहकार्य करण्याची सर्वांची इच्छा असली पाहिजे, घेतलेल्या जबाबदारीप्रमाणें वागण्याची सर्वांची तयारी असली पाहिजे आणि दुसऱ्या देशाच्या कारभारांत हस्तक्षेप न करण्याच्या व सर्व राष्ट्रांच्या समतेच्या तत्वांचें पालन झालें पाहिजे. सोविएत सरकारचे पंतप्रधान जी. एम्. मॅलेन्कोव्ह यांनीं म्हटलें आहे कीं आज असा कोणताच वादग्रस्त किंवा अनिर्णित प्रश्न नाहीं कीं जो शांततेनें सोडवितां येणार नाहीं.

शांतता नसल्यास व राष्ट्राराष्ट्रांत सहकार्य नसल्यास सामाजिक आणि सांस्कृतिक विकास होणें पूर्णपणें अशक्य आहे. समग्र सोविएत जनतेचें आणि सध्याच्या काळांतील सर्व बुद्धिमान व प्रामाणिक स्त्रीपुरुषांचें हें निश्चित मत आहे.

परंतु केवळ निश्चित मत असून भागत नाहीं. गरज आहे ती जनतेच्या प्रत्यक्ष कार्याची आणि प्रयासांची. सर्वविध्वंसक युद्धांच्या भयापासून मानव-जातीला मुक्त करण्याचें कार्य जोपर्यंत जनतेनें हातीं घेतलेलें नाहीं तोपर्यंत हा युद्धाचा धोका जगांतून नाहींसा होणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारांश

तेव्हां, सोव्हिएत युनियन शांततेसाठीं कां लढतें ? आपण पुन्हा एक वार आढावा घेऊं.

सोव्हिएत युनियन शांततेसाठीं लढतें याचें पहिलें कारण कारण हें कीं सोव्हिएत युनियनच्या नागरिकांत एकहि माणूस असा नाहीं कीं ज्याचा लुटारू युद्धांत कांहीं स्वार्थ आहे; जास्तींत जास्त नफा कमावण्याच्या हेतूनें दुसऱ्या देशांना गुलाम बनविण्यासाठीं युद्धाची तयारी जे करतात असे कोणीहि धनिकशहा किंवा मक्तेदार सोविएत युनियनमध्यें नाहींत.

सोव्हिएत युनियन शांततेसाठीं लढतें याचें दुसरें कारण हें कीं सोविएत राज्यांत राज्यसत्ता ही कामकऱ्यांच्या, जनतेच्या हातांत आहे. युद्धाच्या घोर विपत्ति जनतेलाच भोगाव्या लागतात एवढ्यासाठींच कां होईना जनतेला लुटारू युद्धांचा तिटकारा आहे.

सोविएत युनियन शांततेसाठीं लढतें याचें तिसरें कारण हें कीं तें समाजसत्तावादी राज्य आहे व त्यांत जमीन, कारखाने आणि सर्व उत्पादन-साधनें जनतेच्या मालकीचीं आहेत. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या योजनाबद्ध विकासामुळें तेथें जादा उत्पादनाच्या अरिष्टांचें आणि बेकारीचें समूळ उच्चाटन झालें आहे आणि लोकांच्या सतत वाढत्या गरजा जास्तींत जास्त प्रमाणांत भागविण्यासाठींच उत्पादनाचा विकास होत आहे. विधायक परिश्रम, जनतेचे स्वतंत्र निर्मितिक्षम प्रयत्न, सतत वाढत्या प्रमाणावर होणारें शांततामय रचनाकार्य—हा समाजसत्तावादाचा अर्थ आहे.

सोव्हिएत युनियन शांततेसाठीं लढतें याचें चौथें कारण कीं हें तें समाज-सत्तांक राष्ट्रांचें राज्य आहे. सोव्हिएत जनता आणि सोव्हिएत सरकार यांनीं आपल्या राज्यांत राष्ट्राराष्ट्रांमध्यें दोस्ती प्रस्थापित केली आहे आणि त्यापासून होणाऱ्या फायद्यांचा अनुभवहि घेतला आहे. यामुळें (विचारसरणीच्या तसेंच

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आर्थिक [illegible] सर्व राष्ट्रांशी सहकार्य व्हावे यासाठीं ते झटूं शकतात—आणि तसे ते आज झटतहि आहेत—त्याचप्रमाणें जगांतील सर्व राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा व समान अधिकारांचा मान राखणारें धोरण ते अंमलांत आणूं शकतात. कुठल्याहि दोन राष्ट्रांत युद्ध होण्याला सोव्हियत युनियनचा विरोध आहे आणि सर्व तंट्यांचा आणि वादग्रस्त प्रश्नांचा शांततेनें निकाल लागावा यासाठीं तें झटत आहे.

सोविएत युनियन शांततेसाठीं लढतें याचें पांचवें कारण हें कीं आपल्या भौतिक शक्तींच्या सामर्थ्याची आणि स्वतःच्या वैचारिक प्रामाणिकपणाची सोव्हिएत युनियनला पूर्ण जाणीव आहे. आपल्या शांततामय विधायक परिश्रमानेंच आपल्याला आपलें महान् ध्येय गांठता येईल, आणि युद्ध झाल्यास त्यांत अडथळे येऊन आपली प्रगति अपरिहार्यपणें खुंटून राहील याबद्दल सोव्हिएत जनतेला मुळींच संशय नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रक : जयंत भट, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, १९० बी, खेतवाडी मेन रोड,
मुंबई ४. प्रकाशक : टास वृत्तसंस्थेचे हिंदुस्थानांतील प्रतिनिधि,
३५, बाराखंबा रोड, नवी दिल्ली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar